**नियमित दिवाणी कज्जा नं.७६/२०२० मधील** नि.क्र.२० खालील आदेश
(पारित दिनांक-१८/०१/२०२२)

**रामचंद्र कळंत्रे विरुध्द शामराव कळंत्रे वगैरे**

**CNR - MHKO130005212020**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांचे वारसांनी वादी हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस अभिलेखावरती घेण्यास जो विलंब झाला आहे, तो विलंब माफ करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत प्रकरणातील वादी हे दिनांक २५/०५/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. तथापि, दरम्यानच्या कालावधीत कोरोना महामारीच्या प्रार्दुभावामुळे व टाळेबंदी असल्याने व निर्बंध असल्याने वादीच्या वारसांना प्रस्तुत प्रकरणात वेळेत तजवीज करणे शक्य झाले नाही. वादीचे वारस अभिलेखावरती येणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीचे वारस अभिलेखावरती घेण्यास झालेला विलंब माफ करुन मिळण्याकरीता सदर अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

**०३.** प्रतिवादीनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले असून, अर्जातील संपूर्ण मजकूर हा खोटा व लबाडीचा असल्यामुळे व अर्जास संयुक्तिक कारणे नसल्याने, अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीनी केली आहे.

**०४.** उभय बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुत प्रकरणी वादी यांचा मृत्यू दाखला निशाणी क्र. अन्वये अभिलेखावर दाखल आहे. त्याचे अवलोकन करता, वादी यांचा मृत्यू दिनांक २५/०५/२०२१ रोजी झाल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. वादीचे वारस हे हयात असल्याने व त्यांना या प्रकरणी दावा पुढे चालविण्याचा असल्याने सदर वारस अभिलेखावर घेणे न्यायहितार्थ योग्य व गरजेचे राहील असे मला वाटते. निश्चितपणे दाव्याचे स्वरुप पाहता, वादीचे वारस अभिलेखावरती येणे गरजेचे आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी वारस

अभिलेखावरती घेण्यास जो विलंब झाला आहे, त्या विलंबाकरीता वादीवर काही रक्कम खर्च म्हणून बसविणे योग्य राहील असे वाटते, वरील सर्व कारणांचा विचार करता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो-

**- आ दे श -**

१) अर्ज (निशाणी क्र. २०) वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/- ही आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर वादीचे विरुध्द झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Amol Bharat Jawale

Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.01.21 16:39:19 +0530

कागल (**अमोल भारत जवळे**)

दिनांकः– १८/०१/२०२२ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.